# -=: प्रकरण सहावे :=-

## निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ निष्कर्ष

६.३ शिफारशी

६.४ पुढील संशोधनासाठी विषय

६.५ संदर्भ

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष व शिफारशी.

१
६.१ प्रस्तावना :

संशोधकाने " पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास " या विषयाची संशोधनासाठी निवड केली होती या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. त्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, भेटी व संबंधित साहित्य इत्यादि साधनांद्वारे माहिती मिळविली.

मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन प्रकरण क्रमांक पाच मध्ये केले.

या प्रकरणात त्यावरून आलेले निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय या बाबी दिल्या आहे.

६.२ निष्कर्ष :

अ] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांविषयी निष्कर्ष-

१] जास्तीत जास्त मुख्याध्यापक १३ [४०.६२५ % ] हे एम्.ए.बी.एड्. व १० [३१.२५० % ] मुख्याध्यापक बी.ए.बी.एड्. होते, म्हणून पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील बहुसंख्य मुख्याध्यापक योग्य पात्रतेचे होते, त्यातही उच्चशिक्षितांचे प्रमाण अधिक होते ही प्रशासनाच्या दृष्टीने चांगली गोष्ट होती.

२] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हे १० वर्षापेक्षा जास्त काळ मुख्याध्यापकपदाचा अनुभव असणारे व शिक्षक म्हणूनही पुरेसा अनुभव असणारे होते. यशस्वी प्रशासनाच्या दृष्टीने त्यांचा शिक्षक म्हणून व मुख्याध्यापक म्हणून अनुभव चांगला होता.

आ] माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापनाबाबतचे निष्कर्ष -

१] पंढरपूर तालुक्यातील जवळ जवळ सर्वच शाळा ह्या खाजगी व्यवस्थापनाकडून चालविल्या जात होत्या. [ केवळ एकमेव अपवाद म्हणजे नगरपरिषद संचलित एक शाळा ].

२] पंढरपूर तालुक्यातील २० [६२.५०० % ] माध्यमिकशाळा अनुदानि. व ११ [ ३४.३७५ % ] माध्यमिक शाळा विनाअनुदानित होत्या. यावरून अनुदानित शाळांचे प्रमाण अधिक होते.

३] पंढरपूर तालुक्यात १९६१ ते १९७० या दशकात सर्वात जास्त म्हणजे ६ [ १८.७५० %] शाळांना अनुदान सुरु झाले. या दशकाच्या मागील व पुढील दशकात हेच प्रमाण अनुक्रमे कमी कमी होत गेले.

४] ज्या शाळांमध्ये ५ वी ते ७ वी चे वर्ग होते त्याच शाळांमध्ये आवश्यक ते डी.एड्. प्रशिक्षित शिक्षक होते.

१२ [३७.५०० % ] शाळांमध्ये ६ ते १० बी.एड्. प्रशिक्षित शिक्षक होते. ८ [ २५.००० % ] शाळांमध्ये १ ते ५ बी.एड्. प्रशिक्षित शिक्षक होते. ३ [९.३७५% शाळांमध्ये २१ ते २५ बी.एड्. प्रशिक्षित शिक्षक होते.

यावरून बी. एड्. ही माध्यमिक शिक्षकांना आवश्यक असणारी प्रशिक्षणाची पदवी धारण करणारे शिक्षक त्या त्या शाळांच्या आवश्यकतेनुसार होते.

याचा अर्थ पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण करणारे शिक्षक होते.

५] पंढरपूर तालुक्यातील [ १७ [५३.१२५ % ] माध्यमिक शाळां-मध्ये एकच लिपीक काम करीत होता, तर बाकीच्या शाळांमध्ये शाळांच्या विद्यार्थ्यांच्या कमी अधिक संख्येनुसार एकापेक्षा अधिक लिपिक होते.

व्यवस्थापनाच्या पदाधिका-यांच्या व मुख्याध्यापकांच्या चर्चेतून ही लिपिक संख्या अपुरी असून हे प्रमाण ३०० विद्यार्थ्यांमागे एक लिपिक असावे.

६] पंढरपूर तालुक्यातील १ [ ३.१२५ % ] माध्यमिक शाळेमध्ये ९ शिपाई काम करत होते. ६ [ १८.७५० % ] माध्यमिक शाळेमध्ये केवळ एकच शिपाई काम पहात होता.

यावरून पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये त्या शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार प्रत्येक शाळेत १ पासून ९ पर्यंत इतक्या संख्येने शिपाई होते. ज्या शाळात एकच शिपाई होता, त्या शाळा विद्यार्थी संख्येने लहान होत्या तर ९ शिपाई असणारी यशवंत विद्यालय, भोसे ही शाळा विद्यार्थी संख्येने सर्वात मोठी होती.

शिपायांचे हे ठरवुन दिलेले प्रमाण कमी होते.

७] शाळेच्या दैनंदिन कामात अध्यापनाच्या व शालेय विकासाच्या बाबतीत व्यवस्थापक लक्ष घालत होते. अधुन मधुन भेट देत होते, चर्चा करित होते, अडीअडचणी समजून घेत होते हे अत्यंत योग्य होते.

८] जवळ जवळ सर्वच शाळांच्या मुख्याध्यापकांचे व व्यवस्थापकांचे संबंध चांगले असून सर्वच मुख्याध्यापक शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटत होते.

९] विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत आर्थिक अडचणी हया अत्यंत गंभीर आहेत. लोकवर्गणी, देणग्या, निधी, यालाही मर्यादा आहेत. लोक उदासीन असतात, शिक्षकांना पगार देणे, बहुसतांशी भौतिक सुधारणा उपलब्ध करून देणे व शासकिय नियम यांच्या कात्रीत व्यवस्थापक सापडतात व शाळा चालविणे हे एक अवघड काम होते. व्यवस्थापकांची ही स्थिती व शासनाचे धोरण यामध्ये विद्यार्थी भरडला जातो व त्याचे मोठे नुकसान होते.

ड] <u>शिक्षकांच्या प्रशासनासंबंधीचे निष्कर्ष</u> –

१०] लॉगबुक भरण्याबाबत २५ [७८.१२५ %] मुख्याध्यापक फक्त सूचना करण्याचे काम करीत होते व प्रत्यक्ष कारवाई करण्याचे काम फक्त एकच [३.१२५ %] मुख्याध्यापक करत होते.

११] लॉगबुक भरण्यामुळे शिक्षकांच्या अध्यापनात सुधारणा होते असे बहुसंख्य मुख्याध्यापकांनी सांगितले असले तरी शिक्षकांशी चर्चा करता व संशोधकाच्या निरिक्षणावरून असे दिसून येते की, लॉगबुकातील सूचनांची दखल अनेक शिक्षक घेत नाहीत, त्याची चर्चा करीत नाहीत व मुख्याध्यापकही केवळ एक उपचार म्हणून कार्य करतात असे दिसून आले.

१२] २२ [७८.७८ %] प्रतिसादक शिक्षकांना अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्यामध्ये अडचणी येतात. त्यामध्ये सुट्टयांची संख्या जास्त असणे व प्राथमिक शिक्षणातील त्रुटी या बाबी संशोधकाला महत्वाच्या वाटतात.

सहशालेय कार्यक्रम जास्त असल्यामुळे हे अभ्यासक्रम विहित कालावधीत न संपण्याचे कारण संशोधकाला योग्य वाटत नाही.

३० [९३.७५० %] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी विहित कालावधीत विहित अभ्यासक्रम पूर्ण होतो असे उत्तर दिले आहे. परंतु प्रत्यक्ष भेटीत व निरिक्षणात व कांही शिक्षकांशी संशोधकाने चर्चा केली असता खरी वस्तुस्थिती अशी नसल्याचे दिसले. याचा अर्थ ३० [९३.७५० %] प्रतिसादक मुख्याध्यापकांपैका बहुतांशी मुख्याध्यापक वस्तुस्थिती लपविण्याचा प्रयत्न करत होते.

वस्तुत: दरमहा पूर्वनियोजनानुसार विहित कालावधीत विहित अभ्यासक्रम पूर्ण करायला हवा, परंतु बहुतांशी शिक्षक, संस्था व मुख्याध्यापकांच्या मर्जीतील शिक्षक शाळेचे काम दुय्यम समजून इतरच व्यवसाय करीत होते. हे शिक्षक जून ते ऑक्टोबर या प्रथमसत्राचा अभ्यासक्रम सप्टेंबर व ऑक्टोबर या केवळ दोनच महिन्यात संपवत होते म्हणजे उरकत होते. नोव्हेंबर ते एप्रिल या द्वितीय सत्राचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचा औपचारिकपणाच केवळ पार पाडित होते, तर कांही शिक्षक वेळ अपुरा असल्यास विद्यार्थ्यांना कांही भाग ऐच्छिकला पण सक्तीने टाकायला लावून तो भाग शिकविण्याचे टाळत होते ही एक प्रकारे विद्यार्थ्यांची फसवणूकच आहे व प्रशासनाच्या दृष्टीने ही एक गंभीर व दुर्दैवी बाब आहे.

१३] बहुसंख्य मुख्याध्यापकांचे म्हणजे शिक्षकांच्या वेळेवर नेमणुका होतात असे असले तरी प्रत्यक्षात कांही ठिकाणी होत नाहीत. अतिरिक्त शिक्षक नाकारण्याचा प्रयत्न केला जातो. व्यक्ती उपलब्ध असूनही मिळत नाहीत, योग्य पात्रताधारक

उपलब्ध होत नाहीत इत्यादि सबबी दाखवून स्वत:चा माणूस नियुक्त केला जातो, तसेच नेमणुका वर्षारंभी होत नाहीत. त्याची प्रक्रिया बरीच लांबते याला कारण संस्थेच्या पदाधिका-यांनी त्यांच्या मुलाखतीमध्ये असे सांगितले की, राखीव जागेच्या धोरणामुळे व रोस्टरमुळे त्या संवर्गातील शिक्षक उपलब्ध होत नाहीत, कांहीवेळा इंग्रजी विषयाचा पात्रताधारक शिक्षक मिळत नाही. कांही वेळा इंग्रजी माध्यमातून इंग्रजी विषय किंवा अन्य विषय शिकविणारा शिक्षक मिळत नाही.

यावरून शिक्षकांच्या नेमणुका वर्षारंभी करण्यामध्ये अनेक समस्या दिसून येतात, त्याचा परिणाम शाळेच्या गुणवत्तेवर व विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनावर होतो.

१४] राखीव जागेचे धोरण ही शिक्षक नेमणूकीतील सर्वात मोठी अडचण होती. तसेच वशिल्याने नेमल्या जाणा-या शिक्षकांचे प्रमाण जास्त म्हणजे [ ९० %] होते.

१५] विनाअनुदानित शाळेत अपुरा व अनियमित पगार दिला जातो असे दिसून आले आणि प्रस्तुत अपु-या पगाराचा अध्यापनावरही प्रतिकूल परिणाम . होत असल्याचे दिसून आले.

१६] बहुसंख्य म्हणजे २४ [७५.००० % ] मुख्याध्यापकांच्या मते प्रशासकीय कामात सहशिक्षकांना विविध समित्यांवरील नियुक्ती, सहविचार सभेद्वारे कामाची वाटणी, आवडीच्या क्षेत्रातील कामे सोपविणे, कार्यालयीन कामकाज देणे या प्रमाणे सहभागी करून घेतले जाते, परंतु शिक्षकांच्या चर्चेतून प्रशासकीय कामामध्ये त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. शिक्षकांच्या मते मुख्याध्यापक पक्षपात करून काम करणारांनाच जास्त कामे देतात व मर्जीतील शिक्षकांना कमी

कामे देतात. संशोधकाला स्वत:ला आलेल्या अनुभवावरुन व इतर शिक्षकांशी केलेल्या चर्चेतून असे दिसून आले की, कांही मुख्याध्यापक शिक्षकांना प्रशासकीय कामात सहभागी करुन घेतात तर काही सहभागी करुन न घेता शिक्षकांमध्ये पक्षपात करतात, तसेच कांही शिक्षक मनापासून काम करतात तर कांही शिक्षक अध्यापन कार्यापेक्षा खाजगी व्यवसायांनाच जास्त महत्त्व देऊन शाळेकडे दुर्लक्ष करतात.

१७] अकार्यक्षम शिक्षकांबद्दलच्या अडचणी १६ [ ५०.००० % ] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी सांगितल्या यावरुन निम्म्या शाळांत किमान एक तरी अकार्यक्षम शिक्षक असण्याची शक्यता आहे, हे शिक्षक कधीही सुधारत नाहीत. सेवेत संरक्षण असल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई करता येत नाही, म्हणून हे शिक्षक मुख्याध्यापकांना जुमानत नव्हते. विहित अभ्यासक्रम विहित कालावधीत पूर्ण करीत नव्हते. विद्यार्थी, पालक सर्वांच्यामध्ये अकार्यक्षम शिक्षकांच्या बाबतीत नाराजी व असंतोष दिसून येत होता. विद्यार्थ्यांत बेशिस्त वाढते.

या बाबतीत व्यवस्थापक, मुख्याध्यापक यांच्याशी केलेल्या चर्चेतून आणि मुलाखतीतून मुख्याध्यापकांना प्रशासनात अधिक व्यापक अधिकार मिळावेत ही मुख्याध्यापकांची मागणी योग्य वाटते परंतु त्याचा गैरवापरही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१८] १६ [ ५०.००० % ] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी अकार्यक्षम शिक्षकांबद्दल तक्रारी सांगितल्या. २९ [९०.६२५ % ] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. यावरुन बहुतांशी मुख्याध्यापक आपल्या शाळेतील अकार्यक्षम शिक्षकांबद्दल माहिती देत नव्हते, त्यांची नेमकी संख्या लपवित होते.

यावरुन असे दिसून येते की, बहुसंख्य मुख्याध्यापकांच्या २६[६८.७५० %] मते अकार्यक्षम शिक्षकांच्या मदतीला दुसरा सक्षम शिक्षक द्यावा लागत होता, पण त्यामुळे दुसऱ्या शिक्षकावरील कामाचा ताण वाढत होता व हे जादा काम तो मन लावून करेलच असे नाही, कारण त्याच्या कामात त्याला या जादा कामामुळे व्यत्यय येत होता. त्यामुळे प्रशासनाचही वेळ, श्रम, व पैसा यांचा अपव्यय होतो आणि अकार्यक्षम शिक्षकांच्या मदतीला दुसरा शिक्षक दिल्याने अकार्यक्षम शिक्षक कायम तसाच अकार्यक्षम राहतो, बरेच मुख्याध्यापक सामोपचाराने काम करुन घेतात तर कांही थोडे मुख्याध्यापक मात्र खंबीरपणे त्यांच्याकडून काम करुन घेतात असे दिसून येते.

१९] पंढरपूर तालुक्यातील २४ [ ७५.००० % ] शाळांतील एकुण ७० शिक्षक परगांवी राहणारे व रोज येऊन जाऊन करणारे होते म्हणजे फक्त ८ [ २५.००० % ] शाळांतील शिक्षक फक्त स्थानिक होते, म्हणजेच प्रत्येक शाळेचा स्वतंत्रपणे विचार करता परगांवी राहणारे शिक्षक शाळेच्या शिक्षकांच्या संख्यानुसार १ ते १५ पर्यंत परगांवी रहात होते. याचा परिणाम शालेय प्रशासनावर झालेला दिसून येतो.

२०] एकंदर ११ [ ३४.३७५ %] मुख्याध्यापकांनी परगांवी राहणाऱ्या शिक्षकांमुळे कांही समस्या निर्माण होत नाहीत असे सांगितले व ७ [२१.८७५ %] मुख्याध्यापकांनी कोणतेही उत्तर दिले नसले तरी मुलाखतीतून असे दिसून आले की, या शिक्षकांकडून शाळेत वेळेमध्ये किंवा शाळेच्या निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ थांबणे त्यांना अशक्य होते. हे शिक्षक शाळेच्या निर्धारित वेळेनंतर उपलब्ध होत नसल्याने जादा तास, इतर सहशालेय उपक्रम यासाठी उपलब्ध होऊ शकत नव्हते.

या परगांवी राहणाऱ्या शिक्षकांची संपूर्ण कार्यक्षमता शाळेच्या कामासाठी कधीही उपयोगांत येत नव्हती यातही संस्थाचालक, मुख्याध्यापकांच्या मर्जीतील शिक्षकांना अधिक सवलती दिल्या जात होत्या . त्यामुळे मुख्याध्यापक कांही शिक्षकांवर अन्याय करत होते असे दिसून आले.

तसेच जे शिक्षक परगांवी राहत होते त्यांच्याबाबतीत मुख्याध्यापकांना व्यापक अधिकार नसल्याने समज देणे, सूचना देणे, लेखीदेणे, यापलीकडे ते कांहीही करु शकत नव्हते. जे कांही थोडेफार अधिकार मुख्याध्यापकांना आहेत उदाहणार्थ वेतनवाढ रोखणे इत्यादि सारख्या अधिकारांचा वापर करण्यास मुख्याध्यापक धजावत नव्हते. त्यामुळे ही शिक्षकांत बेफिकीरवृत्ती व बेजबाबदार-पणा वाढलेला दिसून येत होता.

यावरुन परगांवी राहणाऱ्या शिक्षकांकडून मन:पूर्वक काम न होणे, वेळेवर शाळेत न येणे जादा तास न घेणे, सहशालेय उपक्रमास गैरहजर राहणे, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष न देणे इत्यादि समस्या निर्माण होतात असे दिसून आले.

२१] सेवाशर्तींचे पालन करण्यात येणाऱ्या अडचणी-बाबत

१५ [४८.८७५ %] मुख्याध्यापकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

सेवाशर्ती बहुतांशी मुख्याध्यापकांना व शिक्षकांनाही माहिती नव्हत्या त्यामुळे कांही मुख्याध्यापक व शिक्षकांनी विसंगत उत्तरे दिली.

ज्यांना सेवाशर्ती माहिती होत्या त्यांनी शाळेच्या वातावरणामुळे त्या पूर्णपणे पाळणे शक्य वाटत नव्हते. त्यांना त्या सेवाशर्ती चांगल्या वाटूनही उपयोग नव्हता.

२२] सेवाशर्ती व रजेच्या सुधारणा बाबत प्रतिक्रीया व्यक्त करताना संस्थेच्या कामकाजाबाबत मुख्याध्यापक नाराज होते असे दिसून आले. चांगल्या प्रशासनासाठी शिक्षकांनी परगांवी न राहता शाळेच्या ठिकाणच्या गांवातच घर करावे. शासनाधिका-यांकडून मुख्याध्यापकांना आदराची वागणूक मिळावी. सेवाशर्ती योग्य व चांगल्या आहेत असे सांगितले.

२३] शिक्षकांना उच्च व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्याबाबत २५ [ ७८.१२५ % ] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी उच्च व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्यासाठी परवानगी देतो असे सांगितले. त्यातील निम्म्या मुख्याध्यापकांनी आवश्यकता वाटल्यास रजाही देतो असे सांगितले. तसेच उत्तेजन देतो असे सांगितले. थोडक्यात २५ [ ७८.१२५ % ] मुख्याध्यापक शिक्षकांनी उच्च व्यवसायिक अर्हता प्राप्त करण्यासाठी अनुकूल होते आणि प्रशासनाच्यादृष्टीने ही चांगली गोष्ट होती.

परंतु सेवाशर्तीचा नियमच व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्याबाबत अनुकूल असल्याने मुख्याध्यापकांनी होय असे उत्तर केवळ औपचारिकपणे दिले. परंतु प्रत्यक्ष मात्र त्यांच्यापैकीच अनेकजण अडवणूक करत होते असे दिसून आले.

२४] बहुतांशी २४ [ ८५.७१ % ] शिक्षकांच्यामते गुणवान शिक्षकाची कदर त्याची प्रशंसाकरून, अभिनंदन करून , प्रोत्साहन देऊन केली जात होती. चर्चेतून दिसून आले की, पुरस्कार, बहुमान यांचा लाभ संस्थाचालक, मुख्याध्यापक, पदाधिकारी यांच्या विशेष मर्जीतील शिक्षकालाच मिळतो. यासाठी गुणवत्ता किंवा त्या शिक्षकाची प्रामाणिकपणे परीक्षा न करता वशिलेबाजी आढळून येते.

तरीपण कांही शाळांतून आदर्श शिक्षक पुरस्कार, प्रशस्तीपत्र दिले जाते, अभिनंदन केले जाते, विशेष जबाबदारी टाकली जाते या गोष्टी निःसंशय शिक्षकाला प्रोत्साहन देणाऱ्या आहेत.

२५] बहुतांशी शिक्षकांचेमते एखाद्या शिक्षकांनी काम चुकविल्यास मुख्याध्यापकांकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही, रेकॉर्ड खराब करण्याची प्रवृत्ती नाही, मुख्याध्यापकांच्या मर्जीत नसणाऱ्या शिक्षकांना मात्र हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो असे दिसून येत होते.

२६] शिक्षकांना अध्यापनाइतकीच अध्यापनेतर कामे, परिक्षा, बुलेटिन तालिका घेणे, कार्यालयीन कामकाजात मदत करणे, सहशालेय कार्यक्रमात सहभाग असणे आवश्यक होते.

विद्यार्थीहित व्यापकपणे डोळ्यासमोर ठेवुन अध्यापनेतर कामे अध्यापनापेक्षा जास्त असतील तरी हरकत नाही याउलट अशी स्थिती आहे की, कांही अध्यापनेतर कामामुळे अध्यापन कार्यात अडथळा येतो. कार्यालयीन काम, इमारत निधी संकलन, विद्यार्थी गोळा करण्यासाठी घरोघरी जाणे ही कामे अध्यापन कार्यात अडथळा आणतात.

२७] विद्यार्थी मोठ्याप्रमाणात गैरहजर असणे, बेशिस्त असणे, पालकांना संपर्क साधण्याची इच्छा असूनही उदासीन व बेफिकीर पालक इत्यादि अडचणी वर्गशिक्षकाला असतात.

शिक्षकांनी नवीन कांही करण्याला प्रशासनाचे सहकार्य मिळत नव्हते.

२८] विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी जादा तास, रात्र अभ्यासिका, वैचारिक कोडी व प्रश्न देणे, वैयक्तिक मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य, विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार प्रज्ञावंतांना खास मार्गदर्शन असे उपाय योजले जात होते.

परंतु बहुतांशी शाळांच्या बाबतीत हे घडत नाही, शिक्षकांकडून प्रामाणिकपणे हे काम जेवढे तळमळीने व्हायला हवे तेवढे होत नाही व पालकही उदासीन असतात.

२९] विद्यार्थ्यांचा करमणुकीकडेच जास्त कल असणे आणि शिक्षकांची केवळ उपचार म्हणून कामे पार पाडण्याची वृत्ती या सहशालेय कार्यक्रमामध्ये येणाऱ्या प्रमुख अडचणी आहेत.

३०] पालकांच्याभेटी ह्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीत लक्षणीय बदल घडवतात असे बहुसंख्य शिक्षकांचे मत होते, परंतु पालक अत्यंत उदासीन असतात व वारंवार बोलवुनही संपर्क ठेवत नाहीत.

३१] बहुतांशी माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापक यांना सेवाशर्तीही माहिती नव्हत्या त्यामुळे त्या पालन करण्यात अडचणी येत होत्या.

३२] जवळजवळ सर्वच माध्यमिक शिक्षक बी. एड्. प्रशिक्षण पध्दतीप्रमाणे पाठ घेत नव्हते. एक टाकाउ पध्दती अशीच त्यांची भावना होती.

३३] रिकाम्या तासिकांना व बुलेटीन तासिकांना बहुतेक शिक्षक नुसते बसुन राहतात व ह्या तासिका म्हणजे केवळ ३५ मिनिटे पार पाडली म्हणजे आपले कर्तव्य पार पाडले अशीच त्यांची भावना होती.

३४] कित्येक शिक्षक तासिका संपण्यापूर्वीच पाठ संपवून टोल पडण्याची वाट पहात वेळ घालवितात.

ई] विद्यार्थ्यांच्या प्रशासनासंबंधीचे निष्कर्ष –

३५] मनाचीच शिस्त व आदरयुक्त धाक निर्माण करणे हाच शिस्तीचा खरा मार्ग असून छडी, दंड व शिक्षा यांचा वापर पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक अत्यल्प करत होते व सहका-यांना करण्यास भाग पाडत होते असे दिसून आले, तर कांही शाळांमध्ये शारीरिक शिक्षणाचे शिक्षक, वर्गशिक्षक वर्गप्रतिनिधी यांच्यामार्फत शिस्तीचे प्रयत्न केले जात होते हे शिस्त लावण्याच्या अधिकारांचे विकेंद्रीकरणच होते ही चांगली गोष्ट होती तर कांही शाळांमध्ये शिक्षा, दंड केला जात होता.

३६] बहुतांशी शालेय व सहशालेय कार्यक्रमांमध्ये मनोरंजनाकडेच जास्त कल दिसून आला, सांस्कृतिक, खेळांच्या स्पर्धा, वनभोजने, सहल, स्नेहसंमेलने इत्यादि कार्यक्रम आयोजित केले जात होते, तर कांही शाळांमध्ये गणेशोत्सव जयंत्या, पुण्यतिथ्या असे कार्यक्रम आयोजित केले जात होते.

३७] बहुतांशी शिक्षकांनी पुरेशी आर्थिक तरतुद नसते हा महत्वाचा अडथळा शालेय व सहशालेय कार्यक्रम आयोजित करण्यांत येतो असे सांगितले सहका-यांची, विद्यार्थ्यांची, पालकांची तसेच शिक्षक व सर्वांचीच उदासीनता दिसून येते वेळेची कमतरता असणे ही कारणे आहेत असे दिसते. उपचार म्हणून कार्यक्रम पार पाडण्याची प्रवृत्ती दिसून येते.

प्रतिसादक मुख्याध्यापक व प्रतिसादक शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचा करमणुकीकडे व मनोरंजनाकडेच जास्त कल असतो असे सांगितले.

३८] विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्यादृष्टीने पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील फक्त १८ [५६.२५० %] मुख्याध्यापक प्रत्यक्ष वैद्यकिय तपासणी व औषध योजना करतात तर उर्वरित शाळांचे १४ [४३.७५० %] मुख्याध्यापक प्रत्यक्ष वैद्यकिय तपासणी करुन घेत नव्हते.

३९] पंढरपूर तालुक्यातील बहुसंख्य माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांची कदर करुन त्यांना अधिक प्रज्ञावंत करण्यासाठी केवळ बक्षिसे, पारितोषिके देत नसून वैयक्तिक मार्गदर्शन, खास मार्गदर्शन करुन ख-या अर्थाने गुणवत्तेकडेच लक्ष देत होत्या ही प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत चांगली गोष्ट होती.

४०] विद्यार्थ्यांची गैरहजेरी कमी करण्यासाठी २० [६२.५०० %] शाळांचे मुख्याध्यापक जागरुक होते, त्यासंबंधी सतत पालकांशी संपर्क साधुन गैरहजेरीबद्दल समज देणे, त्यांची लेखी चिठ्ठी आणण्यास सांगणे असे उपाय करित होते. हे प्रयत्न चांगले होते.

प्रत्येक तुकडीत ६० सरासरी पट मान्य असतो, परंतु गैरहजेरीचे प्रमाण इतके जास्त होते की, ६० पैकी जेमतेम ३० विद्यार्थी किंवा त्याहूनही कमी विद्यार्थीच वर्गात हजर असतात असे जवळ जवळ २५ [७८.१२५ %] मुख्याध्यापकांनी सांगितले व उपरोक्त सर्व उपाय करुनही फारसा फायदा होत नव्हता तरीपण प्रत्येक मुख्याध्यापक व शिक्षक आपल्यापरिने हजेरी वाढविण्याचा प्रयत्न करीत होते.

४१] पालकांनी शाळेत भेटल्यास पाल्य अभ्यास करतो, गुणवत्ता सुधारतो, बेशिस्त कमी होते, गैरहजेरी कमी होते हे फायदे होतात.

पालकांच्या अडीअडचणी समजतात तसेच बहुतांशी पालक निरक्षर, मजूर व्यसनी असल्याने शाळा व शिक्षण याबद्दल त्यांना कोणतीच आस्था वाटत नव्हती व ज्यांना आस्था वाटते ते शाळेत येण्यास धजावत नव्हते असेही कांही शिक्षकांनी मत व्यक्त केले.

पालकांनी शिक्षकांना भेटल्यास निश्चितच चांगला परिणाम होतो असे जवळजवळ सर्वच शिक्षकांचे मत होते. ३३ [ ११७.८१ % ] शिक्षकांच्या मते गुणवत्ता सुधारणे, बेशिस्त कमी होणे, हजेरी वाढणे यावर पालक संपर्क हाच महत्वाचा उपाय असल्याचे शिक्षकांकडून समजले.

४२] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पालकांच्या गाठीभेटी घेणे सहयापुस्तके देणे असे प्रयत्न करित असल्याचे सांगितले. असे प्रयत्न करणारे मुख्याध्यापक जास्त होते, तर इतर म्हणजे स्वत: व सहकारी शिक्षकांनी सतत पालकांचे संपर्कात राहणारे असे प्रयत्न करणाऱ्या मुख्याध्यापकांची संख्या कमी होती. पंढरपूर तालुक्यांतील कांही अपवाद वगळता बहुतांशी माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढविण्याचा कोणता ना कोणता प्रयत्न करावा लागतोच असे दिसून आले ही समस्या जास्त करून, ग्रामीण भागात येत होती, कारण जवळ जवळ प्रत्येक मध्यम लोकसंख्या असणाऱ्या गांवातही माध्यमिक शाळा निघाल्या होत्या.

४३] अत्यंत मोजक्याच प्रसिध्द शाळांमध्ये गुणवत्तेवरून प्रवेश दिला जात होता. तर बहुतांशी सर्वच शाळांमध्ये विद्यार्थ्यांना कोणताही निकष नव्हता.

सर्वांनाच प्रवेश दिला जात होता. उलट विद्यार्थी मिळविण्यासाठी त्या शाळांना प्रयत्न करावे लागत होते.

४४] एका वर्गात विद्यार्थी संख्या जुप असल्यास वर्ग नियंत्रणाकडे व वैयक्तिक लक्ष देण्याकडे दुर्लक्ष होते. असेच बहुसंख्य मुख्याध्यापकांच्या म्हणण्यावरून दिसून येते.

अलीकडे विनाअनुदानित शाळांची संख्या वाढल्याने शेजारच्या अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली दिसून येते, त्यामुळे ब-याच शाळांमधून या समस्या कमी झालेल्या आहेत, मात्र शहरातील प्रसिध्द शाळांमध्ये विद्यार्थी-संख्या प्रत्येक वर्गात जास्त असल्याने वरील समस्या जाणवतात.

४५] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळापैकी फक्त १६[५०.००० %] शाळांमध्येच शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची सुविधा होती. चर्चेतून फक्त बोटावर मोजण्याइतपतच शाळा ख-या अर्थाने शैक्षणिक मार्गदर्शन करत होत्या. बाकीच्या शाळांत प्रशिक्षित कौन्सिलरही नव्हते. सर्वचजण याबाबतीत उदासीन दिसत होते.

४६] पंढरपूर तालुक्यातील फक्त ८ [ २५.००० % ] माध्यमिक शाळांमध्येच ग्रंथपाल होते कारण १००० विद्यार्थीसंख्येमागे एक ग्रंथपाल असे प्रमाण आहे व पंढरपूर तालुक्यातील बहुतांशी २४ [ ७५.००० % ] माध्यमिक शाळा ह्या विद्यार्थीसंख्येच्या दृष्टीने लहान असल्याने तिथे ग्रंथपाल नव्हते. ग्रंथपाल असणा-या शाळा फारच अल्प होत्या.

## उ] आर्थिक बाबींसंबंधीचे निष्कर्ष –

४७] १७ [ ५३.१२५ % ] प्रतिसादक मुख्याध्यापकांनी म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त मुख्याध्यापकांनी फी वसुली ही एक डोकेदुखी व कठीण काम असल्याचे सांगितले, वारंवार फी मागणी करावी लागते असे सांगितले, पण फी भरणारे विद्यार्थी कमी असल्याने हा त्रास मर्यादित आहे, बहुतेक व्यापारी, व्यावसायिक, बागायतदार यांची मुलेही सवलत विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे पत्र देऊन खोटे उत्पन्न दाखवुन मिळवत होते.

जे विद्यार्थी फी भरत होते ते सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कर्मचाऱ्यांचे पाल्य असतात. त्यापैकी बहुतांशी पालक सरकारी नियमांमुळे खोटे उत्पन्न दाखविता येत नसल्याने नाईलाजाने फी भरत होते, फी पासून मिळणारे उत्पन्न तसे कमीच होते.

फी माफीची सवलत घेणारे ९० % विद्यार्थी असतात उर्वरित १० % विद्यार्थ्यांसाठी कागदपत्रे, शासकिय पत्रव्यवहार यात शालेय प्रशासनाचा वेळ, श्रम व पैसा इतका खर्च होतो की त्या ऐवजी शासनाने सरसकट सर्वांनाच पूर्ण फी माफी करून टाकणेच परवडेल असे मुख्याध्यापक, शिक्षक व संस्थाचालक यांचे मत होते.

४८] शासनाच्या अनुदानसूत्राच्या धोरणांबद्दल २५ [ ७८.१२५० % ] मुख्याध्यापक समाधानी नव्हते. व्यवस्थापकांनीही वरील प्रमाणेच नापसंती व्यक्त केली. कारण अनुदान अपूरे व वेळेवर मिळत नव्हते. ज्या ६ [ १८.७५० % ] मुख्याध्यापकांनी कोणत्याही अडचणी नाहीत असे सांगितले त्या शाळा उत्तम

आर्थिक स्थितीच्या, नामवंत व जुन्या शाळा होत्या. नवीन विनाअनुदानित शाळांना या स्पर्धेत टिकाव धरणेही त्यामुळे उवघड होते.

४९] विनाअनुदानित शाळांच्या आर्थिक समस्यांच्याबाबतीत मुख्याध्यापकांनी विनावेतन काम करावे लागण्याचे प्रमाण मुख्याध्यापकांनी जरी कमी सांगितलेले असले तरी प्रत्यक्ष निरीक्षण व शिक्षकांच्या मुलाखतीत विनाअनुदान तुकड्यांवर ९५ % शिक्षकांना कमी पगारावर व पुढे पगार मिळेल या आशेवर काम करावे लागत होते. शिक्षणाधिकारी, शिक्षक यांच्याशी केलेल्या चर्चेतून व प्रत्यक्ष पाहणीतून असे आढळुन आले की, बी. एड्. पात्रताधारकांचे बेकारीचे प्रमाणही खुपच असून त्याप्रमाणांत शिक्षकांची पदे फारच अल्प आहेत. तसेच विनाअनुदानित तुकडीला पुरेशी विद्यार्थीसंख्याही मिळत नाही त्यामुळे विनाअनुदानित प्रशिक्षण महाविद्यालय, विद्यालये, व माध्यमिक शाळा यांचे विनाअनुदान हे तत्त्वच रद्द करावे विनाअनुदान तत्व समाजातील कांही घटकांना स्वार्थासाठी हवे आहे बहुतांशी ज्या माध्यमिक शाळा जुन्या व नामवंत आलेत त्या विनाअनुदानित तुकड्या शक्यतो चालवित नाहीत. विनाअनुदानित शाळांमध्ये कोणत्याही भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या, पुरेशा वर्गखोल्या नव्हत्या, ग्रंथालये नव्हती, प्रयोगशाळा अस्तित्वात नव्हत्या त्या फक्त कागदोपत्रीच होत्या. वर्षानुवर्षे या शाळांत कोणत्याही भौतिक सुविधा उपलब्ध केल्या जात नव्हत्या, तसेच या शाळांची संख्याही विचारात घेण्याइतपत लक्षणीय होती. या शाळेतील विद्यार्थी भौतिक सुविधांअभावी कोणतीही शैक्षणिक प्रगती साधू शकत नव्हते. थोडक्यात विनाअनुदान शाळा म्हणजे शासन, शिक्षक, विद्यार्थी व समाज यांची एक प्रकारची फसवणूकच आहे.

काँही अपवादात्मक विनाअनुदानित माध्यमिक शाळा वगळता बहुतेक सर्वच विनाअनुदानित माध्यमिकशाळा हया बंद करण्याच्याच लायकीच्या आहेत. उपस्थिती बोगस असते हे अगदी सत्य होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाशी विनाअनुदानित शाळा हा एक प्रकारचा क्रूर खेळच आहे.

५०] बहुतांशी २५ [ ७८.१२५ ٪ ] माध्यमिक शाळा हया मुख्याध्यापक संघाच्या प्रश्नपत्रिका वापरतात असे दिसून आले, यामुळे सर्व माध्यमिकशाळांत एक प्रकारची सुसूत्रता दाखविली जाते जी प्रशासनाच्या दृष्टीने चांगली बाब होती.

ऊ] भौतिक सुविधांसंबंधीचे निष्कर्ष –

५१] पंढरपूर तालुक्यातील फक्त १६ [ ५०.००० ٪ ] शाळामध्येच क्रिडांगण असल्याचे आढळले.

५२] पंढरपूर तालुक्यातील फक्त १५ [ ४६.८७५ ٪ ] माध्यमिक शाळामध्येच विज्ञान प्रयोगशाळा असल्याचे आढळून आले.

५३] पंढरपूर तालुक्यातील २२ [ ६८.७५० ٪ ] शाळांमध्येचे सर्व वर्गासाठी व्यवस्थित बसण्यासाठी वर्गखोल्या असल्याचे दिसले या शाळांव्यतिरिक्त असणा–या शाळा हया गोडाऊनची इमारत, देऊळ, ग्रामपंचायत ऑफिस या ठिकाणी भरत होत्या, तर काँही शाळा दुबार पध्दतीने भरविल्या जात होत्या.

५४] बहुतांशी २९ [ ९०.६२५ ٪ ] शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय होती ही प्रशासनाच्या दृष्टीने चांगली बाब होती.

५५] पंढरपूर तालुक्यातील २७ [ ८४.३७५ ٪ ] माध्यमिक शाळांमध्ये मुतारीची सोय होती ही प्रशासनाच्या दृष्टीने चांगली बाब होती.

५६] बहुसंख्य शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली नव्हती.

५७] जेमतेम १६ [ ५०.००० % ] माध्यमिक शाळांमध्येच शैक्षणिक साधनांचे प्रमाण समाधानकारक होते बाकीच्या शाळांत ते अपुरे होते.

ज्या शाळांत हे साहित्य पुरेसे होते त्यापैकी कांही शाळांत हे साहित्य धूळ खात पडून होते.

५८] बहुतांशी माध्यमिक शाळांमध्ये २३ [ ७१.८७५ % ] ग्रंथालयात पुरेशी ग्रंथसंपदा नसल्याचे परखडपणे मुख्याध्यापकांनी सांगितले व ज्या शाळांत पुरेशी ग्रंथसंपदा होती त्या शाळांत त्याचा पूर्ण कार्यक्षमतेने ग्रंथालयाचा उपयोग केला जात नव्हता.

कित्येक शाळांत ग्रंथालयाचे काम शिक्षकाला दिले जात होते व ग्रंथपालाला दुसरेच संस्थेचे काम दिले जात होते.

५९] पंढरपूर तालुक्यातील निम्म्याहून अधिक १८ [ ५६.२५० % ] माध्यमिक शाळांना स्वतःच्या इमारती नव्हत्या त्यामुळे जास्तीत जास्त शाळांत इमारतीसंबंधी समस्या आढळून आल्या.

६०] पंढरपूर तालुक्यातील १५ [ ४६.८७५ % ] शाळांमध्ये भाडोत्री इमारती व पर्यायी व्यवस्था केल्याचे दिसून आले.

६१] बहुसंख्य अनुदानित शाळात प्रयोगशाळा सुसज्ज आहेत परंतु त्यांचा वापर शून्यच होता. केवळ मुले फोडतील, उपकरणांची मोडतोड करतील, नासधूस होईल अशी व्यर्थ भिती त्यामागे आढळून आली.

६२] सुसज्ज जिमखाना असूनही बहुसंख्य शाळांत त्याचा वापर केला जात नव्हता शारीरिक शिक्षण म्हणजे त्या तासाला विद्यार्थी क्रिडांगणावर नेणे व परत वर्गावर आणणे ही स्थिती बहुतेक सर्वच शाळांमध्ये आढळली. विद्यार्थ्यांचे ख-या अर्थाने शारीरिक शिक्षण होत नव्हते. कित्येक विद्यार्थ्यांना खेळांची नांवे व खेळांच्या प्राथमिक साहित्यांची नांवेदेखिल सांगता आली नाहीत. अशा शारीरिक शिक्षकांना नियुक्त करणे म्हणजे वरील प्रकारच्या शाळांच्या शिक्षकांच्या बाबतीत प्रशासनाने कौशल्याचा वापर योग्यरितीने न केल्याने हे शिक्षक पांढरे हत्ती म्हणून पोसावे लागत होते.

## ४] शालेय प्रशासनातील सुधारणांसंबंधीचे निष्कर्ष -

६३] मुख्याध्यापकांना अधिक व्यापक प्रशासकीय अधिकार असावेत असे मुख्याध्यापकांनी सांगितले.

६४] मुख्याध्यापकांचा बहुतांशी वेळ शासकीय पत्रव्यवहार आणि माहिती गोळा करण्यांतच जातो हे काम कमी होणे गरजेचे आहे असे मुख्याध्यापकांनी सांगितले.

६५] राजकारण व शिक्षण यांची फारकत करावी असे शिक्षक व भागशिक्षणाधिका-यांनी सांगितले.

६६] शासकीय नियंत्रणे कमी करावीत असे संस्थाचालकांनी सांगितले.

६७] प्रशासन हा भाग संस्थेकडून काढून घेऊन शासनाकडे द्यावा असे भागशिक्षणाधिका-यांनी सांगितले.

६८] भागशिक्षणाधिका-यांना अधिक व्यापक अधिकार मिळावेत असे भागशिक्षणाधिका-यांनी सांगितले.

६९] शाळांतील कर्मचारी नियुक्त्या व शासकीय पातळीवर भ्रष्टाचाराचे प्रमाण प्रचंड आहे म्हणून नियुक्त्या करताना गुणवत्ताच विचारात घ्यावी असे प्रतिसादक मुख्याध्यापक, शिक्षक व भागशिक्षणाधिका-यांनी सांगितले.

७०] गटशिक्षणाधिकारी व भागशिक्षणाधिकारी हे केवळ उपचार म्हणून वर्षातून एकदा केव्हातरी किंवा वार्षिक तपासणीच्या वेळेसच भेट देतात व केवळ शासकीय कार्य पार पाडित होते असे दिसून आले.

७१] शिक्षणाधिकारी भेटीच्या वेळी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, कार्यालय इत्यादि संबंधीची रेकॉर्डतपासणी करत होते, परंतु भौतिक सुविधा व तत्सम मार्गदर्शन करण्याबाबत उदासीनच होते.

भागशिक्षणाधिका-यांना माध्यमिक शाळांसंबंधी कारवाई करण्याचे कोणतेही अधिकार नसल्याने कोणत्याही शाळा त्यांना जुमानत नव्हत्या. या अधिका-यांना वागणूकही तितकीशी योग्य दिली जात नव्हती.

यावरून भागशिक्षणाधिकारी व माध्यमिक शाळा यांचा तसा फारसा संबंध शासकिय नियमानेच ठेवलेला नसल्याने फक्त नामधारी अधिकारी अशीच स्थिती भागशिक्षणाधिका-यांची माध्यमिक शाळांच्या बाबतीत होती.

७२] भागशिक्षणाधिकारी शाळांना भेटीच्यावेळी विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, शैक्षणिक दर्जा वाढविणे, कागदपत्रांची पुर्तता करणे इत्यादि सूचना सर्व-सामान्यपणे देत होते.

७३] शिक्षक जगवण्यासाठी व शाळाचालविण्यासाठी बोगस तुकडया बोगस पट, बोगस हजेरी व बोगस शालेय दप्तर या शिक्षणाधिका-यांना कार्यालयीन कागदपत्रात वारंवार आढळणा-या त्रुटी होत्या.

७४] पंढरपूर तालुक्यातील ५० % माध्यमिक शाळा क व ड गटातील होत्या. ५० % माध्यमिक शाळा ब गटात होत्या व एकही शाळा अ गटातील नव्हती.

७५] गटशिक्षणाधिकारी व भागशिक्षणाधिकारी पातळीवरील सूचना हया फक्त कागदावरच राहतात बव्हंशी शाळा त्याची दखल घेत नाहीत.

७६] तालुक्यातील माध्यमिक शाळा व पंचायत समितीचा शिक्षण विभाग यांचा तसा फारसा संबंध शासकीय नियमानेच अत्यल्प आहे असे दिसून आले. माध्यमिक शाळेच्या शासकिय पातळीवरील सर्व व्यवहार थेट जिल्हा शिक्षणाधिकारी [माध्यमिक ] यांच्याशीच होतो.

७७] प्रयोगशाळा सहाय्यक संपूर्ण वेळ फक्त विज्ञान प्रयोगशाळा साहित्य जतन करण्यातच घालवतो शिक्षकांना सहकार्य करण्यासाठी तो उदासीन असतो, असे दिसून आले.

७८] प्रयोगशाळा सहाय्यकाप्रमाणे शिपाई देखील पाटया टाकण्याचेच काम करत होते, याला कारण प्रशासकाचे कौशल्य कमी पडत होते.

## ६.३ शिफारशी :-

मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन करून त्यावर आधारित निष्कर्ष वरिलप्रमाणे आहेत. या निष्कर्षाच्या आधारे संशोधकाने पुढीलप्रमाणे शिफारशी दिलेल्या आहेत.

क] व्यवस्थापकांच्या मुलाखतीद्वारे सुचविलेल्या शिफारशी -

१] शाळेच्या दैनंदिन कामात व्यवस्थापकांनी जरूर लक्ष घालावे परंतु शिक्षक वर्गात वेळेवर जातात का, त्यांचा पाठपुरावा करून त्यांचे पाठ निरीक्षण करणे या मुख्याध्यापकांच्या कामात मात्र हस्तक्षेप करूनये. व्यवस्थापकाचे अधिकार म्हणजे दुधारी शस्त्र आहे त्यांनी ते अत्यंत जपून व विचारपूर्वकच वापरणे आवश्यक आहे.

२] शिक्षक नेमणूकीसाठी देणगी व वशिला याला अजिबात थारा नसणे चांगल्या, निकोप शिक्षणासाठी गरजेचे आहे .

३] शिक्षक नियुक्तीत शासनानेही थोडे लवचिक धोरण दाखविणे आवश्यक आहे.

४] विनाअनुदानित शाळांच्या आर्थिक समस्यांचे गांभीर्य लक्षात घेता कोणत्याही शाळेला मान्यता देतानाच शासनाने अनुदानही द्यावे अन्यथा मान्यताच देऊ नये. विनाअनुदान हे तत्वच रद्द करणे आवश्यक आहे.

५] शाळांना, मुख्याध्यापकांना, शिक्षकांना केवळ दोष देणे व मार्गदर्शन करण्याबाबत उदासिन असणे हे भागशिक्षणाधिकाऱ्यांच्या बाबतीत आढळते, म्हणून या अधिकाऱ्यांनीही तळमळीने व नियमित भेटी देऊन नियमित संपर्क ठेवणे, मार्गदर्शन करणे आवश्यक आहे . फक्त सूचना देणे हेच आपले काम नसून शिक्षक व विद्यार्थी यांची वैयक्तिक भेट घेणे, त्यांना मार्गदर्शन करणे हेही शिक्षणाधिकाऱ्याच्या दृष्टीने तितकेच आवश्यक व महत्वाचे काम आहे.

६] बोगस तुकड्या, बोगस पट, बोगस हजेरी आणि बोगस शालेय दप्तर हा गंभीर नैतीक गुन्हा असून प्रामाणिक शासकीय अधिकारी व प्रामाणिक संस्थाचालकांनी या बाबत अत्यंत गांभीर्याने खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे.

७] पंढरपूर तालुक्यातील शाळांमध्ये एकही शाळा अ गटातील नव्हती किमान एकतरी शाळा अ गटात असणे व आदर्श म्हणून पुढे येणे आवश्यक आहे.

ब] [१] <u>शिक्षकांच्या प्रशासनासंबंधीच्या शिफारशी</u> -

८] मुख्याध्यापकांनी लॉगबुक भरून केवळ सूचना देण्याचेच काम न करता प्रत्यक्ष कारवाई करणे आवश्यक आहे.

९] लॉगबुक हे मुख्याध्यापकाच्या हातातील अध्यापनात सुधारणा घडवून आणण्याचे चांगले साधन आहे, त्याचा मुख्याध्यापकांनी कार्यक्षमतेने वापर केला पाहिजे.

१०] मुख्याध्यापकांनीही दुय्यम व्यवसाय करणा-या शिक्षकांच्या बाबतीत कडक कारवाई करण्याचे कठोर धोरण अवलंबणे आवश्यक आहे.

विहित अभ्यासक्रम विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी स्वत: मुख्याध्यापकांनी प्रशासकिय कौशल्य वापरणे अत्यंत गरजेचे आहे.

११] शिक्षकांनी शिक्षकी पेशा हा दुय्यम व्यवसाय न समजता ह्या पवित्र क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. विहित अभ्यासक्रम विहित वेळेतच पूर्ण करणे आवश्यक आहे तरच शाळेचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागेल.

१२] शिक्षकांच्या नेमणुका वर्षारंभी करण्यात अनेक समस्या येतात म्हणून शासनानेही शिक्षक नेमणूकीत थोडीशी लवचिकता दाखविणे आवश्यक आहे.

१३] शिक्षक नियुक्तीत वशिला व देणग्या ह्या गोष्टी बंद होणे आवश्यक आहे. गुणवत्तेलाच प्राधान्य द्यावे.

१४] विनाअनुदान तत्वाच्या शाळांतील एकुण समस्यांचा विचार करता हे तत्वच रद्द करुन शाळेला मान्यता व अनुदान एकाच वेळी सुरु करावे अन्यथा शाळांना मान्यताच देऊ नये .

१५] शिक्षकांना प्रशासनात सहभागी करुन घेताना प्रशासनाने वस्तुनिष्ठ धोरण अवलंबणे गरजेचे आहे.

१६] अकार्यक्षम शिक्षकांच्याकडून मुख्याध्यापकांनी खंबीरपणे काम करुन घेणे आवश्यक आहे.

१७]ए सेवाशर्तीनुसार शिक्षक हा २४ तास शाळेसाठी बांधील असून त्याने मुख्याध्यापक सांगतील तेंव्हा शाळेत हजर राहणे आवश्यक असते म्हणून शिक्षकांनीही शाळेच्या ठिकाणीच राहणे प्रशासनाच्या-दृष्टीने चांगले आहे.

१८] सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी सेवाशर्ती माहिती करुन घेऊन त्यांचे पालन करावे.

१९] शिक्षकांना उच्च व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्यासाठी मुख्याध्यापकांनी मनापासून तळमळीने प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

ब] [२] शिक्षकांच्या मुलाखतीद्वारे सुचविलेल्या शिफारशी-

२०] एखाद्या शिक्षकाने काम चुकविल्यास कारवाई करताना मुख्याध्यापकांनी वस्तुनिष्ठपणे व निपक्षपातीपणे धोरण अवलंबणे आवश्यक आहे. कोणावरही अन्याय न होण्याची खबरदारी घ्यावी.

२१] अध्यापन कार्यात अडथळा आणणारी अध्यापनेतर कामे उदाहरणार्थ इमारतनिधी संकलन, कार्यालयीन कामकाज सांभाळणे ही कामे शिक्षकांवर लादू नयेत.

२२] वर्गशिक्षकांना विद्यार्थ्यांची गैरहजेरी, बेशिस्त व बेफिकीर, उदासीन पालक या बाबतीत सबबी न सांगता, धीर न सोडता शिस्त लावलीच पाहिजे. आपले कौशल्य पणाला लावून खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. प्रशासक यांनीही वर्गशिक्षकांच्या अडचणींबाबत आस्थापूर्वक लक्ष घालणे आवश्यक आहे.

२३] विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनीच तळमळीने व प्रामाणिकपणे काम करणे आवश्यक आहे.

२४] विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रत्येक महिन्याला क्रमाने प्रत्येक वर्गाची पालक सभा घेणे अत्यंत आवश्यक आहे.

ख] [३] <u>भेटी व पहाणीद्वारे शिक्षकांसंबंधी सुचविलेल्या शिफारशी</u> -

२५] सर्व मुख्याध्यापक, शिक्षक यांनी सेवाशर्ती अभ्यासाव्यात.

२६] सर्व माध्यमिक शिक्षकांनी आळस न करता बी. एड्. प्रशिक्षणाच्या पध्दतीप्रमाणेच पाठ घेणे आवश्यक आहे.

२७] रिकाम्या व बुलेटिन तासिकांना शिक्षकांनी नुसते बसून ३५ मिनिटे वेळ काढू नये कांहीतरी उपक्रम राबवावेत, विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देणे आवश्यक आहे.

२८] शिक्षकांनी टोल पडण्यापूर्वीच पाठ संपवून टोल पडण्याची वाट पहाण्यापेक्षा अत्यंत काटेकोरपणे पाठनियोजन करणे व पाठ टाचण काढून मगच अध्यापन करावे.

ग] विद्यार्थ्यांच्या प्रशासनासंबंधी शिफारशी -

२९] विद्यार्थ्यांचा मनोरंजनाकडे व करमणूकीकडेच कल आहे ही सबब आहे. प्रशासकाने आपले कौशल्य पणाला लावल्यास विद्यार्थ्यांचे कलामध्ये निश्चित बदल होतो.

कोणत्याही कार्यक्रमाचे यश हे सांघिक भावनेवर अवलंबून असल्याने प्रत्येका आपल्या परीने प्रामाणिकपणे काम करणे आवश्यक आहे.

३०] विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वच शाळा प्रत्यक्ष वैद्यकिय तपासणी व औषधोपचाराची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी.

३१] विद्यार्थ्यांची गैरहजेरी कमी करण्यासाठी पालकांशी संपर्क अधिक उपयोगी व महत्वाचा असल्याने मुख्याध्यापकांनी सतत चा पालक संपर्क ठेवणे आवश्यक आहे.

३२] बहुसंख्य माध्यमिक शाळांमधून गैरहजेरी ही एक गंभीर समस्या आहे तरी पण शिक्षकांनी धीर न सोडता निदान प्रामाणिकपणे स्वत: कडूनतरी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

३३] प्रत्येक पालकांनी शाळेतील प्रत्येक शिक्षकांची संपर्क ठेवावा व पाल्याची जातीने चौकशी आवश्यक आहे. सर्वच गोष्टी शिक्षकांवर लादून जबाबदारीतून मोकळे होऊ नये.

३४] मुख्याध्यापकांनी पंढरपूर तालुक्यातील प्रत्येक माध्यमिक शाळेत शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची प्रशिक्षीत कौन्सीलरसह सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

घ] आर्थिक बाबीसंबंधी शिफारशी -

३५] शासनाने फीचे उत्पन्न व अंदाजपत्रके पाहता सर्वांनाच माध्यमिक स्तरावर पुर्ण फी माफी करावी.

३६] निधी व अनुदान वेळेत मिळावे हीच माफक अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली होती ती योग्यच आहे. विनाअनुदानित शाळांच्या वेतनेतर अनुदानात वाढ करावी व त्यांना शुल्के माफ द्यावे.

३७] जर विद्यार्थ्यांना सुविधा शाळा देऊ शकत नसेल तर त्या व्यवस्थापन शाळा चालविण्याचा नैतिक अधिकार गमावलेला असतो. यामधील बहुतांशी विना-अनुदानित शाळा ह्या बंदच करणे योग्य ठरले.

३८] सर्वच शाळांनी मुख्याध्यापक संघाच्या प्रश्नपत्रिका वापरण्यास हरकत नाही.

च] भौतिक सुविधांसंबंधीच्या शिफारशी -

३९] पंढरपूर तालुक्यातील ज्या ५० % शाळांना क्रिडांगण नाहीत त्यांना क्रिडांगण असणे गरजेचे आहे.

४०] पंढरपूर तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांना विज्ञान प्रयोगशाळा असणे अत्यंत आवश्यक आहे.

४१] सर्व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना व्यवस्थित बसण्यासाठी वर्गखोल्या असणे आवश्यक आहे.

४२] स्वच्छतागृह असणे ही अत्यावश्यक बाब असल्याने उर्वरित ५ [ १५.६२५ % ] शाळांमध्येही मुतारीची सोय होणे आवश्यक आहे.

४३] शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र खोली असणे आवश्यक आहे कारण रिकाम्या तासाला शिक्षकांना विश्रांती घेता येते, अभ्यास करता येतो, अन्यथा कोठेतरी थांबून व कसातरी वेळ घालवावा लागतो.

४४] ज्या शाळात शैक्षणिक साधनांचा वापर होत नव्हता ते धूळ खात पडून होते त्या ठिकाणी मुख्याध्यापकांनी स्वत: लक्ष घालून सर्व साहित्याचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होतो कां व त्याचे उपयोगितामुल्य विद्यार्थ्यांना पूर्णपणे मिळते कां ते पहावे. ज्या शाळेत पुरेसे साहित्य नव्हते तेथे पुरेसे साहित्य घेण्यात यावे. शिक्षकांनी सबबी न सांगता विद्यार्थ्यांच्या सहाय्याने अल्पखर्ची व अल्पमोली शैक्षणिक साधने तयार करुन घ्यावीत.

४५] ग्रंथालयात पुरेशी ग्रंथसंपदा हवी. वेळ पडल्यास त्यासाठी अनुदान वाढवुन मिळावे शिक्षकांकडे ग्रंथालयाचे काम देऊ नये ज्या शाळांत अर्धवेळ किंवा पूर्णवेळ ग्रंथपाल नियुक्त आहे त्याला कार्यालय अगर तत्सम दुसरे काम न देता ग्रंथालयाचाच कारभार द्यावा.

४६] भाडोत्री इमारतीत स्वत:ला हव्या त्या सुविधा शाळाला करता येत नाहीत, जागा अपुरी पडते, बंधने असतात या गोष्टींचा विचार करता त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो म्हणून प्रत्येक शाळेला स्वत:ची इमारत असणे आवश्यक आहे.

४७] सुसज्ज प्रयोगशाळेचा मनसोक्त वापर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करु देणे आवश्यक आहे हे साहित्य नुसतेच धुळखात पडल्यास शाळा व राष्ट्र यांचा वेळ, श्रम आणि पैसा यांची हानी होते.

४८] शारिरीक शिक्षण हे बौध्दिक शिक्षणाइतकेच महत्वाचे असल्याची जाणीव शारिरीक शिक्षकांना देणे आवश्यक असून क्रिडांगण, खेळाचे साहित्य यांचा पूरेपूर वापर करुन जिमखान्याची पूर्ण कार्यक्षमता मिळविणे आवश्यक आहे.

छ] माध्यमिक शाळांच्या कर्मचा-यांसंबंधी शिफारशी -

४९] दर ३०० विद्यार्थ्यांमागे एक लिपिक असे लिपीकाचे प्रमाण असावे.

५०] प्रत्येक लहान शाळेत किमान दोनतरी शिपाई असावेत.

## ६.४ पुढील संशोधनासाठी विषय :-

संशोधनाचा हा विषय व्यापक असल्याने संशोधकाला संशोधनाच्या व्याप्तीमध्ये कांही मर्यादा पाळाव्या लागल्या. संशोधकाने केवळ प्रशासन आणि तेही फक्त पंढरपूर तालुक्यापुरतेच केल्यामुळे व्यवस्थापन, संघटन इत्यादि इतर बाबींकडे लक्ष देता आले नाही अशा कांही विषयांवर संशोधन करता येईल असे संशोधकास वाटते असे कांही विषय पुढे दिले आहेत.

१] संशोधकाने आपल्या संशोधनाचे कार्यक्षेत्र एकाच तालुक्यापूरते मर्यादित ठेवलेले आहे. यापुढील संशोधकाने संशोधनासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र वाढवून हाच अभ्यास करणे फायदेशीर ठरेल

२] पंढरपूर किंवा कोणत्याही नगरपालीकांतील शिक्षण समितीच्या प्रशासनाचा अभ्यास.

३] एका नगरपालीकेच्या शाळातील भौतिक सुविधांचा अभ्यास.

४] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

५] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील भौतीक सुविधांचा चिकित्सक अभ्यास.

६] पंढरपूर तालुक्यातील अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा तुलनात्मक अभ्यास

**-**